अधीक्षक अभियंता (विद्युत व यांत्रिकी) या पदावर पदोन्नतीने पदस्थापना.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग

शासन आदेश क्रमांकः एसएलएस-१२१७/(३९९/२०१७)/आ (वर्ग-१)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
तारीख: ०७ मे, २०१८.

शासन आदेश :-

जलसंपदा विभागातील खालील कार्यकारी अभियंता (विद्युत व यांत्रिकी) यांना अधीक्षक अभियंता (विद्युत व यांत्रिकी) या पदावर रुपये १५६००-३९१०० + श्रेणीवेतन (Grade pay) रु७६००/- या वेतनश्रेणीत खुल्या प्रवर्गातील रिक्त पदांवर सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१५.०३.२०१८ च्या पत्रान्वये आस्थापना मंडळाने शिफारस केल्यानुसार तदर्थ स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे.

१. श्री.सत्येंद्र यशवंतराव वेर्णेकर

२. श्री.प्रविण अप्पुनी पोडुवल

२. वर नमूद अधिकाऱ्यांना खालील अटींच्या अधीन राहून तदर्थ / तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे :-

१. सदर तदर्थ पदोन्नती ही मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.२७९७/२०१५ मध्ये दि.०४.०८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या व प्रलंबित असलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ वरील मा.सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहील.

२. वरील अधिकाऱ्यांची पदोन्नती ही कार्यकारी अभियंता (विद्युत व यांत्रिकी) संवर्गाच्या अंतिम ज्येष्ठतेच्या व त्यामध्ये होणाऱ्या बदलांच्या अधीन राहील व या पदोन्नतीमुळे वरील अधिकाऱ्यांना सदर पदोन्नतीच्या दिनांकापासून ज्येष्ठतेचा हक्क मागता येणार नाही.

३. सदर अधिकाऱ्यांना देण्यात आलेली पदोन्नती कोणतीही पूर्वसूचना किंवा नोटीस न देता रद्द करण्याचा अधिकार शासन राखून ठेवीत आहे.

४. सदर अधिकाऱ्यांविरूध्द कोणतीही विभागीय चौकशी प्रलंबित नाही.

३. पदोन्नत झालेल्या वरील अधिकाऱ्यांची पदोन्नतीने नियुक्ती सार्वजनिक सेवेच्या हितार्थ व प्रशासकीय सोईच्या दृष्टीने खालील प्रमाणे करण्यात येत आहे:-

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	सध्या धारण करीत असलेले पद	पदोन्नतीने नियुक्तीचे पद	अभिप्राय
१	२	३	४	५
१.	श्री.सत्येंद्र यशवंतराव वेर्णेकर	कार्यकारी अभियंता, जलविद्युत व उपसा सिंचन संकल्पचित्र विभाग, कोल्हापूर	अधीक्षक अभियंता, कोयना (वि.व यां.) संकल्पचित्र मंडळ, पुणे	रिक्त पदी
२.	श्री.प्रविण अप्पुनी पोडुवल	कार्यकारी अभियंता, विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, नागपूर	अधीक्षक अभियंता, विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन मंडळ, नागपूर	रिक्त पदी

४. सदर पदोन्नत अधिकाऱ्यांना कळविण्यात येते की, त्यांनी पदोन्नतीचे/नियुक्तीचे आदेश प्राप्त झाल्यापासून तात्काळ नियुक्तीच्या ठिकाणी हजर होणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे ते विहित मुदतीत नियुक्तीच्या ठिकाणी हजर झाले नाहीत, तर त्यांना सदर पदोन्नतीमध्ये स्वारस्य नाही असे गृहीत धरुन शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसिआरव्ही-१०८७/११३१/प्र.क्र.११/८९/बारा, दि.३०.०४.१९९१ मधील तरतूदीनुसार शासनस्तरावरुन त्यांची पदोन्नती रद्द करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

५. वरील पदोन्नत अधिकारी हे नवीन नियुक्तीच्या जागी कोणत्या दिनांकास हजर झाले याबाबत संबंधीत अधिकाऱ्यांनी शासनास **doesttclass1.wrd@maharashtra.gov.in** या ई-मेल संकेतस्थळावर त्वरित अवगत करावे.

६. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक **२०१८०५०७१७४८०४८८२७** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sunil Gangaram Gangarkar

Digitally signed by Sunil Gangaram Gangarkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8b2512fdfec4104829bc2f439e33adb2e3f823a285cfade8149e690564bc13f6, cn=Sunil Gangaram Gangarkar
Date: 2018.05.07 17:51:12 +05'30'

(सु.गं. गांगरकर)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल महोदयांचे सचिव.
२) मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव.
३) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.
४) अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) प्रधान सचिव (जलसंपदा)/ सचिव (जलसंपदा व्यवस्थापन व लाक्षेवि) / सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) सर्व कार्यकारी संचालक / महासंचालक, जलसंपदा विभाग.
७) सर्व मुख्य अभियंता व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय,मुंबई.
८) मुख्य अभियंता (विद्युत), जलविद्युत प्रकल्प, मुंबई.
९) महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता), १-मुंबई / २-नागपूर.
१०) सर्व अधीक्षक अभियंता (विद्युत व यांत्रिकी), जलसंपदा विभाग.
११) खाजगीसचिव, मा. मंत्री(जलसंपदा), मंत्रालय, मुंबई.
१२) खाजगी सचिव, मा. राज्यमंत्री(जलसंपदा),मंत्रालय, मुंबई.
१३) उप सचिव (का-१३), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) संबंधीत अधिकारी.
१५) संबंधीत जिल्हा कोषागार अधिकारी.
१६) सर्व कार्यासने, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई .
१७) कार्यासन आ (वर्ग-१), संग्रहार्थ.